राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

" (सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६)द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)"

(विद्या विभाग)

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.

दूरध्वनी क्रमांक: कार्यालय: ०७१२–२५३२०६३ फॅक्स : ०७१२–२५५५७०१


पत्र क्रमांक रातुमनावि/विद्या/१८/६३५ दिनांक ३० जुलै, २०१८

# : अधिसूचना :

सर्व संबंधीतांना सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेल्या असाधारण राजपत्र क्र. ४९ दिनांक १७.८.२०१५ अन्वये व त्या अनुषंगाने निर्गमित केलेल्या दिनांक २५.८.२०१५ रोजीच्या शासन आदेशान्वये महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या अनुसूचीमध्ये उल्लेख असलेल्या विद्यापीठाच्या विविध प्राधीकरणाच्या निवडणुका दिनांक ३१ ऑगष्ट २०१६ पर्यत पुढे ढकलण्यात आल्या होत्या तसेच दिनांक ३१ ऑगष्ट २०१६ पर्यत कोणत्याही सदस्यांची रिक्त पदे भरण्यात येवु नये असे निर्देश दिले होते. त्यामुळे विद्यापीठातील विविध विषयाची अभ्यासमंडळे, परीक्षा समित्या, संशोधन व मान्यता समित्या व इतर वैधानिक समित्या अस्तीत्वात नसल्याने व निवडणूक प्रक्रिया थांबविल्याने त्या पूर्णत: गठीत करता येत नसल्याने त्याचे कामकाज खोळंबले होते. त्यामुळे विद्यार्थी व विद्यापीठाच्या शैक्षणिक हिताच्या दृष्टीने विद्या व परीक्षा विषयक कामासाठी तात्पूरती व्यवस्था निर्माण करणे अनिवार्य असल्यामुळे मा. कुलगुरुंनी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम,१९९४ च्या कलम १४ (७) अंतर्गत व्यवस्थापन परिषदेच्या वतीने विविध अभ्यासमंडळाला नेमून दिलेल्या कामासंबधी मा. कुलगुरुंना शिफारशी करण्यासाठी सोबत संलग्न केलेल्या परिशिष्ट १ ते ९ नुसार अभ्यासमंडळ निहाय विशेष कार्य समित्या अधिसूचना क्रमांक रातुमनावि/विद्या/१५/५१३ दिनांक १६ ऑक्टोबंर, २०१५ नुसार गठीत केल्या होत्या.

महाराष्ट्र शासनाने दिनांक २७ फेब्रुवारी, २०१७ रोजी राजपत्र असाधारण भाग चार–ब नुसार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ दिनांक १ मार्च,२०१७ पासून लागु करण्याचा आदेश निर्गमित केलेला होता. सदर अधिनियमातील तरतुदीनुसार विद्यापीठाच्या विविध प्राधीकरणांच्या निवडणुकीची प्रक्रीया सुरू व्हावयाची होती. त्यामुळे नियमित अभ्यासमंडळाचे गठन होईस्तोवर यापुर्वी निर्गमित करण्यात आलेली विद्यापीठाची अधिसूचना क्रमांक रातुमनावी/विद्या/१५/५१३ दिनांक १६ ऑक्टोबर,२०१५ नुसार सद्या कार्यरत असलेल्या अभ्यासमंडळनिहाय विशेष कार्यसमित्या (Special Task Committies) दिनांक १ सप्टेंबर, २०१७ पासुन पुढील आदेशापर्यंत विद्यापीठाचे निर्देश कमांक १५/२०१७ व निर्देश क्रमांक १७/२०१७ नुसार गठित ४ विद्याशाखेअंतर्गत कार्यरत राहतील असे अंतिम शुध्दीपत्रक क्रमांक रातुमनावी/विद्या/१७/२०४ दिनांक ३१ ऑगस्ट,२०१७ रोजी निर्गमित करण्यात आले होते. त्यानुसार सदर अभ्यासमंडळनिहाय विशेष कार्यसमित्या (Special Task Committies) सद्या कार्यरत आहेत.

**परंतु महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ च्या कलम ४०(२) (क) ते (घ) मधिल तरतुदिनुसार अभ्यासमंडळाच्या निवडणुका संपन्न झालेल्या आहेत. याबाबत एकुण ५४ अभ्यासमंडळाच्या अध्यक्ष/सभासदांच्या निवड, नामिती/स्विकृतीबाबतच्या अधिसूचना विद्यापीठाद्वारे वेळोवेळी निर्गमित झालेल्या आहेत. त्यामुळे अधिसूचना क्रमांक रातुमनावी/विद्या/१५/५१३ दिनांक १६ ऑक्टोबर, २०१५ व याअनुषंगाने वेळोवेळी निर्गमित झालेल्या शुध्दिपत्रकाद्वारे गठित व सध्या कार्यरत असलेल्या परिशिष्ट १ ते ९ नुसार अभ्यासमंडळनिहाय विशेष कार्य समित्या (Special Task Committies) व त्या अनुषंगाने विद्यापीठाच्या इतरही विभागात सध्या कार्यरत विशेष कार्य समित्यापैकी (Special Task Committies) खालील तक्त्यातील विशेष कार्य समित्या मा.कुलगुरू महोदयांनी आज दिनांक ३० जुलै,२०१८ रोजी बरखास्त केलेल्या आहेत.**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. Physics | 15. Accounts and Statistics | 29. Psychology | 43. Applied Science & Humanities |
| 2. Botany | 16. Business Economics | 30. Geography | 44. Chemical Engineering |
| 3. Bio-chemistry | 17. Commerce | 31. Rural Service | 45. Metallurgical Engineering |
| 4. Statistics | 18. Business Admn. & Business Mgt. | 32. Physical Education & Recreation | 46. Architecture |
| 5. Languages in Science | 19. Languages in Commerce | 33. Social Work | 47. Production Engineering |
| 6. Electronics | 20. English | 34. Home Economics | 48. Human Development |
| 7. Microbiology | 21. Marathi | 35. Music | 49. Extension Education |
| 8. Computer Science | 22. Hindi | | |
| 9. Electrical Engineering | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| 10. Electronics Engineering<br>11. Food & Nutrition<br>12. Textile & Clothing<br>13. Cosmetic Technology.<br>14. Pharmaceutical Sciences | 23. Sanskrit<br>24. History<br>25. Economics<br>26. Political Science<br>27. Sociology<br>28. Philosophy | 36. Fine Arts<br>37. Library & Inform. Science<br>38. Geology<br>39. Environmental Science<br>40. Family Resource Management<br>41. Civil Engineering<br>42. Mechanical Engineering | 50. Hotel Mgt. & Cat. Tech.<br>51. Law<br>52. Urdu<br>53. Ancient Indian History, Culture & Arch<br>54. Education |

तसेच उपरोक्त तक्त्यातील अभ्यासमंडळाचे गठन झाल्यामुळे सदर अभ्यासमंडळाचे अध्यक्ष/सदस्य या पुढे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ मधिल तरतुदी नुसार कार्य करतिल. परंतु या अभ्यासमंडळा व्यतिरिक्त ज्या अभ्यासमंडळाचे संपुर्ण गठन झालेले नाही अशा विद्यापीठातील विविध विषयाची अभ्यासमंडळे, परीक्षा समित्या, संशोधन व मान्यता समित्या व इतर वैधानिक समित्यावर सध्या अस्तित्वात असलेल्या जुण्याच विशेष कार्य समित्या (**Special Task Committies**) पुढील आदेशापर्यंत कार्यरत राहतील याची संबधीतांनी कृपया नोंद घ्यावी.

मा. कुलगुरुंच्या आदेशानुसार

(डॉ.निरज खटी)
कुलसचिव (अतिरिक्त.प्रभार)

प्रतिलिपी माहितीकरीता :–

१. मा. कुलगुरू,
२. मा. प्र– कुलगुरू,
३. मा. कुलसचिव,
४. मा. संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ
५. मा. वित्त व लेखाअधिकारी,
६. सर्व विद्याशाखेचे मा. अधिष्ठाता,
७. विशेष कार्य समित्यांचे सर्व मा. समन्वयक व सदस्य,
८. उपरोक्त तक्त्यातील सर्व अभ्यासमंडळांचे मा.अध्यक्ष व सदस्य,
९. विद्यापीठाचे सर्व अधिकारी,
१०.डॉ.(श्रीमती) विना प्रकाशे, माहितीशास्त्रज्ञ

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

(डॉ.अनिल हिरेखन)
उपकुलसचिव (विद्या)